

# पोटासाठी उत्तर दिशा...

## (भाग ३)

### 'इतनी जल्दी क्या है?'

एक दिवस बापूनं सुचवलं की, 'आपण देवासला जाऊ या.' त्या वेळी देवास ज्यूनियर आणि सीनियर अशी दोन संस्थानं होती. आम्ही ज्यूनियरला गेलो. तिथं त्याचे काही परिचित होते, त्यांच्या वशिल्यानं देवासच्या राजेसाहेबांच्याकडे माझ्या गाण्याचा कार्यक्रम करण्याची खटपट तो करणार होता. आम्ही देवासला गेलो. बापूचा मित्र आमच्यासारखाच तरुण होता. त्याचे वडील सरकारी नोकरीत होते. त्यांनी खटपट केली आणि दिवाणजींची गाठ घालून दिली. त्यांना बऱ्याच विनवण्या केल्यानंतर राजेसाहेबांना माझं गाणं ऐकवण्याचं त्यांनी मान्य केलं. गाणं दोन दिवसांनी होतं. बापू इंदूरला परत गेला. मी त्याच्या मित्राकडे राहिलो.

राजेसाहेबांच्या समोर गाणं म्हणजे एक मजेदार प्रकार होता. ते गाणं राजेसाहेबांच्या समोर नव्हतंच. राजेसाहेब त्यांच्या एका पाहुण्यासमवेत जेवायला बसले होते. मी त्यांच्यापासून दीडदोनशे फुटांवर होतो. तिकडं त्यांचं जेवण चाललं होतं, इकडं गाणं चाललं होतं. त्यांचं गाण्याकडे लक्ष असायचं काही कारण नव्हतं. साधारणपणे तासभर हा प्रकार चालला होता. राजेसाहेब जेवून उठले आणि निघून गेले. माझ्याकडे त्यांनी ढुंकूनसुद्धा पाहिलं नाही. मी घरी आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी दिवाणसाहेबांच्या ऑफिसमध्ये गेलो. बराच वेळ तपश्चर्या केल्यावर त्यांची भेट झाली. बिदागीविषयी विचारताच ते म्हणाले, ''दो दिन के बाद आना.'' माझ्याबरोबर मित्राचे वडील आले होते. ते पडले सरकारी नोकर. मुकाटपणे आम्ही परतलो. दोन दिवस त्यांच्याकडे राहाणं मला बरं वाटलं नाही, म्हणून मी इंदूरला परत गेलो. देवास-इंदूर अंतर थोडं, भाडंही बेताचं होतं. दोन दिवसांनी पुन्हा देवासला गेलो. पुन्हा दिवाणसाहेबांच्याकडे

खेटे घातले. उत्तर मिळालं, "इतनी क्या जल्दी है? दोन-तीन रोजके बाद आना." मी चक्रावून गेलो. पण बोलायची सोय नव्हती. तरीपण मी म्हटलं, "मी देवासला राहात नाही. इंदूरहून आलोय. कृपा करून आज पैसे दिलेत, तर मेहेरबानी होईल." त्यांचं उत्तर, "अभी तक पैसा सँक्शन नहीं हुआ है."

मी मनातल्या मनात चरफडत इंदूरला परत गेलो. आशा एकच होती की, काहीही झालं तरी राजेसाहेबांच्याकडचं गाणं, तेव्हा पन्नास-पाऊणशे तरी सहज मिळतील. दोन-तीन दिवसांनी परत देवासला गेलो.

गेल्याबरोबर दिवाणसाहेबांनी म्हटलं, "आओ, भाई, ये लो तुम्हारा पैसा," असं म्हणत त्यांनी माझ्या हातावर पाच रुपये ठेवले. मी डोळे विस्फारून त्या पाच रुपयांकडे पाहातच राहिलो. पाच रुपये? देवासच्या राजासमोर म्हटलेल्या गाण्याचे फक्त पाच रुपये? माझ्या इंदूर-देवासच्या तीन चकरा झाल्या होत्या. पेटीवाले आणि तबलजी यांना मला पैसे द्यायचे होते. मी संतापून विचारलं, "सिर्फ पाँच रुपये?"

दिवाणजी म्हणाले, "तो क्या? इतनाही पैसा सँक्शन हुआ है. तुम जा सकते हो."

मी मुकाट्यानं बाहेर पडलो. काही करू शकत नव्हतो. सारखं मनात येत होतं की, हे सँक्शनबिंक्शन झूट असलं पाहिजे. सँक्शन दुसरा कोण करणार? याचीच लबाडी असली पाहिजे. जो राजा माझ्याकडं ढुंकूनसुद्धा न बघता गेला, तो थोडाच पैसे सँक्शन करणार होता? माझ्या खाती जास्त पैसे टाकून त्यातले पाच रुपये मला देऊन बाकीचे यानंच ढापले असले पाहिजेत, असा मला संशय येऊन गेला.

घरी आल्यावर मित्राला म्हटलं की, "मी जाऊन राजेसाहेबांच्यासमोर उभा राहातो आणि विचारतो, खरं काय आहे?" त्या मित्रानं त्याच्या वडिलांना ते सांगितलं. तिथं परिचय झालेल्या इतरही काही जणांना मी माझा विचार सांगितला. त्यांनी सल्ला दिला की, 'तू असं काही करू नकोस. त्या मित्राचे वडील सरकारी नोकर आहेत. त्यांच्याच ओळखीनं हा तुझा कार्यक्रम झाला आहे. तू त्यांच्याच घरी राहातो आहेस. असं काही केलंस तर त्यांच्या नोकरीवर याचा परिणाम होईल. हे संस्थान आहे. इथं काहीही होऊ शकतं.'

मी मुकाट्यानं स्वस्थ बसलो. पाच रुपयांतले दीड-दीड रुपये पेटीवाले आणि तबलजींना दिले. एकूण हा साराच प्रकार आतबट्ट्याचा झाला होता. इंदूर-देवास हेलपाट्यांत माझे जास्त पैसे खर्च झाले होते. त्या मित्राला आणि त्याच्या वडिलांना खूप वाईट वाटलं. पण करणार काय? ते संस्थान होतं. त्यांचाही नाइलाज होता. श्रीमंतांपेक्षा आणि राजेरजवाड्यांपेक्षा सामान्य माणसांचाच माझा अनुभव चांगला होता. देवासही त्याला अपवाद नव्हतं.

देवासला माझ्या नित्य स्मरणात राहणाऱ्या आणखी काही गोष्टी घडल्या. माझ्यावर अतिशय माया करणारी एक बहीण मला तिथं मिळाली. तिचं नाव चंपूताई पुराणिक. देवासचे प्रसिद्ध गायक आणि व्यवसायानं इंजिनियर असलेले श्री. कृष्णराव मुजुमदार यांची ही बहीण. इंदूरच्या प्रसिद्ध पुराणिक घराण्यातल्या श्री. हरिभाऊ पुराणिकांची पत्नी.

तिची माझी भेट झाली ती तिच्या माहेरी, कृष्णरावांच्या घरी. पूर्वजन्मीचं नातं असल्यासारखा आमचा दोघांचा स्नेह जुळून आला. हरिभाऊ आणि चंपूताई उज्जैनला राहात असत. हरिभाऊंनी तिथं 'हॉटेल आय व्हिजिट' या नावाचं छोटं हॉटेल सुरू केलं होतं. चंपूताईनं मला आग्रहानं उज्जैनला यायला सांगितलं. माझी परिस्थिती आणि निरागसपणा पाहून माझ्याविषयी तिच्या मनात अनुकंपा निर्माण झाली असली पाहिजे.

## बटणांची राखी बांधणारी बहीण

कृष्णराव मुजुमदारांच्याच घरी आणखी एका गुणी आणि प्रवासी व्यक्तीची ओळख झाली. त्या व्यक्तीचं नाव आशाताई फडके. माझ्याच आडनावाच्या या बाई उत्तम कीर्तन करीत. दिसायला भारदस्त, सुंदर आणि प्रसन्न चेहरा लाभलेल्या. उत्तम वाणी, चांगला गळा असलेल्या आशाताई कीर्तन करीत भारतभ्रमण करीत होत्या. पं. महादेवशास्त्री जोशींच्या पत्नी आणि गोव्याच्या स्वातंत्र्यसंग्रामात धडाडीनं नेतृत्व केलेल्या, गोवा काँग्रेसच्या काही काळ अध्यक्ष असलेल्या, सत्याग्रहात स्वत: भाग घेऊन त्यापायी पोर्तुगीजांचा अपरिमित छळ सोसलेल्या सौ. सुधाताई जोशी आणि आशाताई फडके या बहिणीबहिणी.

आशाताई गाणी छान म्हणत. त्यांच्याकडून मी दोन कविता शिकलो. सोलापूरचे प्रसिद्ध कवी 'संजीव' यांच्या त्या कवितांच्या पहिल्या ओळी होत्या- 'झिमझिम झिम झिम पाऊस पडतो' आणि 'चल उठ उठ आता, सजणा पहाट झाली.' या कवितांच्या चालीही त्यांनी चांगल्या लावल्या होत्या. त्या मी त्यांच्याकडून शिकलो. माझ्या संग्रहात त्या कवितांच्यामुळं चांगली भर पडली.

आणखी एक लक्षात राहणारी गोष्ट देवासला घडली. संगीतातल्या जाणकार काही मंडळींनी माझं गाणं ऐकायची इच्छा प्रदर्शित केली. एका सकाळी मी तास सव्वा तास तोडी गायलो. ख्याल आणि जलद चीज. शास्त्रीय संगीताचा माझा रियाझ नाशिक सोडल्यापासून सुरू होता. गावोगावी कार्यक्रम होत ते मुख्यत: शास्त्रीय संगीताचेच. एका छोट्याशा खोलीत दहा-बारा जणांच्या समोर मी गायलो. गुरुवर्य पाध्येबुवांनी तोडी राग तीन-साडेतीन महिने शिकवला होता, त्याचं त्या दिवशी चीज झालं. मी स्वत:वर खूष होऊन गेलो, असा त्या सकाळी 'तोडी' जमला. त्या दिवशीची सकाळची ती मैफल मला अजून आठवते. दहा-बारा वर्षांपूर्वी कुमार गंधर्व आग्रह करून मला देवासला गणेशोत्सवात गाण्यासाठी घेऊन गेले होते. असे कार्यक्रम गेली जवळजवळ अठरा-वीस वर्षं मी गणेशोत्सवात करीत नाही, तरी त्यांच्या आग्रहामुळं मी गेलो. त्या वेळी मला भेटलेल्या मंडळींत १९३९ साली एका सकाळी देवासला मी गायलेला तोडी ऐकलेले काहीजण होते. त्यांनीही मोठ्या आनंदानं ती आठवण सांगितली.

देवासहून मी इंदूरला परत आलो. आता डोक्यात विचार होते परत मुंबईला जायचे. साधारणपणे चाळीस-पन्नास रुपये जवळ होते. मुंबईत ज्यांच्या ज्यांच्याकडून चार आणे, आठ आणे, रुपया, दोन रुपये उसने घेतले होते, त्यांची यादी त्यांच्या पैशासह

रायकरकडे पाठवून सर्व पैसे आतापर्यंत फेडले होते. त्यामुळे उजळ माथ्यानं मुंबईत जाऊ शकत होतो. प्रकृतीही सुधारली होती. मुंबईत जाऊन काय करणार होतो, कुणास ठाऊक! पण मुंबईची ओढ मात्र फार होती.

मुंबई सोडल्यापासून माझा काय तो पत्रव्यवहार परममित्र यशवंत केदारे आणि रायकरबरोबरच केवळ होता. इतर कुणालाही माझ्याविषयी काही माहिती नव्हती. मी मुंबईला येतोय, असं त्यांना कळवलं, त्याच दिवशी बापू घारपुरेनं एक अनपेक्षित प्रश्न विचारला, "सुधीर, दिल्लीला जातोस का? फुकट जायला मिळेल. वामन फाटक नावाच्या एका स्वयंसेवकाचं झोन तिकीट आहे. तो दिल्लीला जाऊन आलाय. अजून दोन दिवस ते तिकीट चालणार आहे. तू जात असशील, तर तुला मी ते देववतो."

ही एक अचानक आलेली संधी होती. अनायासे दिल्ली पाहायला मिळत होती आणि तीही फुकट. एकदम आठवण झाली, रामभाऊ गुळवण्यांनी म्हटलं होतं, "राम, ग्वाल्हेरला कधी आलास तर माझ्याचकडं यायचं बरं का!" या झोन तिकिटावर ग्वाल्हेरला जाता येणार होतं. दोन-चार मिनिटं विचार केला आणि बापूला 'होय' म्हणून सांगितलं. लगेच यशवंत केदारेला आणि रायकरला तशी पत्रं लिहिली.

माझ्या नशिबाच्या चक्रानं एक अनुकूल गिरकी घेतली. इतक्या लांब जायचं तर एखादी बॅग सामानासाठी हवी होती. आतापर्यंत मी केवळ एक पिशवीच घेऊन फिरत होतो. बापूनं आणि मी राणीपुऱ्यात जाऊन एक पत्र्याची बॅग साडेतीन रुपयांना विकत घेतली. इंदूरहून ग्वाल्हेरला जायला रतलामवरून तसंच उज्जैनवरूनही मार्ग होता. उज्जैनवरून जाताना भोपाळला गाडी बदलावी लागत असे. चंपूताईनं मला उज्जैनला बोलावलं होतं. मी इंदूरातल्या सगळ्यांचा निरोप घेऊन उज्जैनला गेलो. योगायोग असा की, त्याच वेळी आशाताई फडके तिथं आल्या होत्या. त्यांनाही दिल्लीला जायचं होतं. आम्हा दोघांनाही आता एकमेकांची सोबत मिळाली.

चंपूताईकडून निघायच्या वेळी कोट घालू लागलो, तेव्हा तिच्या लक्षात आलं की, माझ्या सदऱ्याच्या हाताला बटणं नाहीत. ती आत गेली, बटणांचा एक जोड घेऊन आली. तिनं स्वत:च्या हातानं ती बटणं लावली आणि म्हणाली, "सुधीरभैय्या, ही बटणं नाहीत बरं का. मी बटणांच्या रूपानं राखी बांधतेय तुला. या तुझ्या बहिणीवर असंच प्रेम ठेव. तू अनोळखी भागात जातोयस. काळजी घे. मला पत्र पाठव."

माझ्या डोळ्यांत पाणी आलं. तिच्याही डोळ्यांत पाणी होतं. मी तिला वाकून नमस्कार केला. ती माझ्यापेक्षा वयानं मोठी होती. आशाताई आणि मी आगगाडीत बसलो.

ती गाडी मला थेट उत्तरेत घेऊन जाणार होती. मुंबईहून उत्तरेच्या मार्गावर निघालेला मी, आता अनपेक्षितपणे प्रत्यक्ष उत्तरेतच पोचणार होतो. अज्ञातात मारलेली उडी मला आणखी कुठं कुठं घेऊन जाणार होती, कुणास ठाऊक!

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)